**महाराष्ट्र शासनाने मुल्यवर्धीत कर**
**२००५(MVAT)**
**प्रणाली लागू केल्याने बांधकाम**
**करारामध्ये करावयाची तरतूद**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक -बीडीजी-२००५/प्र.क्र.३२४/इमारती-२**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ३ मार्च २००६**

वाचा :- शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक -संकीर्ण -१००५/ प्र.क्र.४५७/ रस्ते-५, दिनांक ११ जुलै-२००५.

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र शासनाने दिनांक १ एप्रिल २००५ पासून महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (Maharashtra Value Added Tax Act 2005) कायदा लागू केला आहे. सदर कायद्यामुळे बांधकाम करार करणा-या कंत्राटदाराने नियमानुसार लागू केलेला मुल्यवर्धीत कर अदा करणे अनिवार्य झाले आहे. कंत्राटदाराने बांधकाम साहित्यावरील मुल्यवर्धीत कर अदा करून बांधकाम साहित्य वापरावयाचे असल्याने बांधकाम कराराच्या किंमतीवर निश्चितच परिणाम होणार आहे. या प्रकरणी स्थापत्य विषयक कामांकरिता लागणा-या बांधकाम साहित्याच्या दरावर मुल्यवर्धीत करामुळे होणा-या परिणामांचा सखोल अभ्यास करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग स्तरावर मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली उपरोक्त दि.११ जुलै २००५ च्या शासन निर्णयान्वये एक समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल सादर केला आहे.

**शासन निर्णय** - सदर समितीने केलेल्या शिफारशी शासनाने स्विकारल्या असून सार्वजनिक बांधकाम विभागातील बांधकामांसाठी या प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे,

१) अ) दिनांक १.४.२००५ पासून मुल्यवर्धीत कर लागू झाला असल्याने ३१ मार्च २००५ पूर्वी निश्चित करण्यात आलेल्या व दिनांक ३१.३.२००५ पूर्वी कार्यारंभ आदेश दिलेल्या निविदांवर मुल्यवर्धीत कर अधिनियमाच्या कलम ९६ जी नुसार मुल्यवर्धीत कराच्या तरतूदी लागू होणार नाहीत. या निविदा वर्कस् कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट २००० च्या प्रचलित नियमानुसार कार्यान्वित राहतील.

ब) दिनांक १.४.२००५ रोजी व त्यानंतर काढलेल्या व निश्चित झालेल्या निविदा मूल्यावर्धित कर नियमानुसार कार्यान्वित होतील.

क) दिनांक १.४.२००५ पूर्वी काढलेल्या व प्राप्त झालेल्या, परंतु १.४.२००५ नंतर कार्यारंभ आदेश दिलेल्या, निविदांचे बाबतीत, त्या १.४.२००५ पूर्वी दाखल झालेल्या असल्याने व त्यावेळी नवीन मूल्यवर्धीत करप्रणाली अस्तित्वात आली नसल्यामुळे

कंत्राटदारांना त्यांच्या नवीन कर दायित्वाबाबत कल्पना नव्हती. परंतु पूर्वीच्या निविदांमध्ये कंत्राटाच्या बाबतीत संपूर्ण करावयाची खरेदी ही नोंदीत व्यापा-यांकडून करणे बंधनकारक होते. अशा प्रकारचे १.४.२००५ पूर्वीचे खरेदीवर मुंबई विक्रीकर कायद्यान्वये देय कर भरून व १.४.२००५ पासूनचे खरेदीवर मूल्यवर्धीत कर कायद्यान्वये देय असलेला कर भरून, खरेदी करणे अपेक्षित असल्यामुळे वर नमूद करण्यात आलेल्या निविदांच्या बाबतीत, -

१) कंत्राटदाराने त्या कंत्राटाच्या बाबतीत विक्रीकर विभागातील संबंधित निर्धारणा अधिका-यांकडून प्रमाणित करून घेतलेली कर दायित्वाची रक्कम (व्याज व दंड वगळता), व

२) सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कंत्राटाकरिता आवश्यक ठरविलेल्या वेगवेगळ्या मालाच्या रकमेवर, प्रचलित कराच्या दरानुसार, देय होणारी कराची रक्कम,

ह्या दोहोंमधील (१ वजा २) फरक ज्या रकमेचा असेल ती रक्कम, अतिरिक्त म्हणून देय होईल. परंतु अशी रक्कम परिच्छेद ४ मधील तरतूदीच्या रकमेपर्यंत मर्यादित राहिल. अनुज्ञेय रकमेचे मंजूरी आदेश पारित करण्यापूर्वी, कंत्राटदाराने, विक्रीकर विभागातील संबंधित निर्धारणा अधिका-याकडून सदर कंत्राटावरील कर दायित्वाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

ड) मूल्यवर्धीत कर समाविष्ट नसलेल्या दरसूचीचा उपयोग करून निविदांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असली तरी कंत्राटदाराने निविदा भरताना त्यामध्ये सर्व करांचा समावेश करून निविदा भरणे अपेक्षित असल्याने व सदरच्या मालमत्तेचे रूपांतरण होणार असल्याने (Transfer of property in goods) दिनांक १.४.२००५ नंतर स्विकारण्यात आलेल्या निविदांना मूल्यवर्धीत कराचा परतावा अनुज्ञेय राहणार नाही.

२) ज्या कामांच्या निविदा बोलाविण्यात येत आहेत /येणार आहेत,त्यातील अस्तित्वातील विक्रीकर कलम ऐवजी खालील कलमाचा अंतर्भाव करावा.

**"The tender rates are inclusive of all taxes, rates, cesses and are also inclusive of the leviable tax in respect of sale by trasnfer of property in goods involved in the execution of a work contract under the provision of Rule 58 of Maharashtra Value Added Tax Act 2005, for the purpose of levy of Tax. "**

३) **जिल्हा दरसुची तयार करण्यासाठी मार्गदर्शक सुचना**

जिल्हा दरसूचीमधील साहित्याच्या दरात मूल्यावर्धीत कर अंतर्भूत असल्याने जिल्हा दरसूचीमध्ये खालीलप्रमाणे टीप समाविष्ट करण्यात यावी.

**" Since the basic rates of materials adopted while preparing the rates abstract of items are as per market rates which include VAT and other taxes, no separate provision is required to be made in the DSR items i.e. rates considered in the DSR are inclusive of VAT. "**

**४) अंदाजपत्रकात अंतर्भूत करावयाच्या तरतूदी.**

ज्या कामांची अंदाजपत्रके तयार करणे प्रगतीपथावर आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे वाढीव तरतूदी गोषवारामध्ये (Recapatulation sheet) करण्यात याव्यात. (सदर तरतूद ही कामाच्या भागासाठी लागू राहील.)

i) इमारत बांधकाम - ०.७५% (अधिकतम)

ii) रस्ते व पूल बांधकामे - ०.५०% (अधिकतम)

सदर मुल्यवर्धीत कराची (VAT) तरतूद सन २००५ ची जिल्हा दरसूची ज्या कालावधीसाठी लागू आहे त्या कालावधीसाठी लागू राहील. सन २००६ ची दरसूची निश्चित करताना मूल्यवर्धीत कराचा परिणाम विचारात घेऊन दर निश्चित करावे.

**५) टि.डी.एस. (T.D.S.) च्या तरतूदी**

करार किंमतीच्या २% इतका कर मूल्यवर्धीत कर अधिनियमांतर्गत नोंदणी झालेल्या कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करण्यात यावा. मूल्यवर्धीत कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून ४% कर वसूल करण्यात यावा. सर्व आहरण व संवितरण अधिका-यांची विक्रीकर प्राधिका-यांकडे नोंदणी करण्यात यावी. कोषागारात जमा करावयाची रक्कम शासनाने दर्शविलेल्या लेखाशिर्षाखाली पुस्तकी समायोजनाद्वारे जमा करण्यात यावी. जेणेकरून कोषागारात कर जमा करण्यास होणारा विलंब टाळता येईल. कंत्राटदाराच्या देयकातून टि.डि.एस. वजाती केल्यानंतर कार्यकारी अभियंता कंत्राटदाराला विहित नमुन्यात तात्काळ प्रमाणपत्र देईल.

नोंदणीकृत कंत्राटदाराला मूल्यवर्धीत कर अधिनियमाच्या कलम ८ व ९ खाली नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक असून कंत्राटदाराने निविदा लिफाफा क्रमांक १ सोबत त्याची प्रत सादर करणे बंधनकारक राहील. यानुषंगाने निविदा प्रपत्रात तरतुद करण्यात यावी.

महाराष्ट्र सा.बां.विभागाच्या नियमपुस्तिकेत दुरूस्ती चिठ्ठी(Correction slip) स्वतंत्रपणे लावण्यात यावी.

सदर आदेश जलसंपदा विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(भो. आर. गांगुर्डे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. मुख्यमंत्री ह्यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (सा.बां.) जलसंपदा ह्यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सा.बां.)/जलसंपदा ह्यांचे खाजगी सचिव,
वित्त विभाग/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर,
सचिव (रस्ते), ,ह्यांचे स्वीय सहाय्यक सार्वजनिक बांधकाम विभाग,
सचिव (बांधकामे) ह्यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग
जलसपंदा विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी -

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग,
मुख्य अभियंता, बृहन्मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई, महाराष्ट्र,
गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई, महाराष्ट्र,
औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (सिडको),
निर्मल बिल्डींग, नरीमन पॉइंट, मुंबई
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई,
पाटबंधारे विकास महामंडळ, कृष्णा/तापी/गोदावरी/विदर्भ/कोकण
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई,
आयुक्त, सर्व महानगरपालिका (२ प्रतींसह),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा,
अधीक्षक अभियंता व प्रादेशिक अधिकारी, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय, मुंबई,
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग,
अधीक्षक अभियंता, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ,वरळी, मुंबई/
महानगर पालिका, ठाणे/पुणे/कल्याण
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग/जिल्हा परिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२, (निवड नस्ती)